# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २८ जुलै, २०१५ / श्रावण ६, १९३७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री** } **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### कडलास (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथे एकाच कुटुंबातील व्यक्तींवर हल्ला करुन घर पेठविल्याबाबत

**(१) * २७४३८ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडलास (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथे शेतजमिनीचा कब्जा व कुळवहिवाट सोडावी म्हणून संतप्त झालेल्या २५-३० जणांच्या जमावाने संगनमताने शिवीगाळ, दमदाटी करीत दहशत निर्माण करुन काठ्या, कुऱ्हाड, गजाने केलेल्या हल्ल्यात एकाच कुटुंबातील महिला व पुरुष असे ९ जणांना दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी गंभीर जखमी करुन घर पेटवून दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद गुन्ह्यात २३ आरोपीविरुध्द सांगोला पोलीस स्टेशन जि.सोलापूर येथे गु.र.नं. ६१/२०१५ भा.दं.वि. कलम ३०७, ३२६, ३२५, ३२४, ४३६, ४२७, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ प्रमाणे दि. २५/०३/१५ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात ३ जण गंभीर जखमी झाले असून ६ जणांना किरकोळ दुखापत झाली आहे.

(२) गुन्हयाच्या तपासात गुन्हयातील २३ आरोपीपैकी ११ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींना न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर केलेला आहे. गुन्हयात वापरलेली ३ ट्रॅक्टर हेड व १ डंपीग ट्रॉलीसह गुन्हयात वापरलेली शस्त्रे जप्त केलेली आहेत.

गुन्हयात तपास करुन प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सांगोला यांचे कोर्टात दोषारोप दाखल केलेले आहे. सद्य:स्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबई येथील म्हाडाच्या मालकीच्या असलेल्या संक्रमण शिबिरातील निवासी गाळा भाडेकरुला दिल्याबाबत**

**(२) * १६८७९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मालकीच्या असलेल्या संक्रमण शिबिरातील निवासी गाळा अधिका-यांनी परस्पर तिस-याच भाडेकरुला दिला असल्याचे प्रकरण दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीअंती दोषी आढळून येणा-या संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सद्य:स्थितीत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात किती भाडेकरु राहत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अंतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील संक्रमण शिबीरातील निवासी गाळा परस्पर तिस-याच भाडेकरुला अधिका-यांनी दिल्याचे प्रकरण दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आलेले नाही.

(२) उक्त प्रकारचे प्रकरण दिनांक १९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास आढळून आलेले नाही.

मात्र वर्ष २०१० मध्ये धारावी संक्रमण शिबीरामध्ये अनधिकृत घुसखोरी तसेच गाळा विक्री होत असल्याबाबतच्या तक्रारी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यावर चौकशी करण्यात आली होती. या प्रकरणी मुंबई

इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ६ अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द कारवाई करण्यात आली होती. तसेच याबाबत धारावी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सद्य:स्थितीत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहर व उपनगरातील ४० संक्रमण शिबीरांमध्ये २१८९० गाळे असून त्यात पात्र व अपात्र असे एकूण २०२३५ रहिवाशी आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेलगाव खु (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील महिला सरपंचास लाच घेतल्या प्रकरणी पकडल्याबाबत**

**(३) * २०७७२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलगाव खु (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत आलेला निधी वर्ग करण्यासाठी ५ लाख रुपयांची लाच घेतांना येथील सरपंच शोभाबाई राऊत व तिच्या साथीदारांस लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडल्याचे दिनांक २७ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषी महिला सरपंचावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) आरोपी श्रीमती शोभाबाई राऊत, सरपंच मौ.शेलगाव, (जि.नांदेड) व श्री. राजू राजेगोरे यांनी तक्रारदार यांच्याकडून शेलगाव खु. येथील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत आलेला निधी वर्ग करण्यासाठी रु.१,००,०००/- इतकी लाचेची मागणी करुन ती स्वीकारली असता, त्यांना दि. २६.०५.२०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे पकडण्यात आले आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी आरोपी श्रीमती शोभाबाई यंशवंत राऊत, सरपंच शेलगाव खु. (ता.अर्धापूर, जि.नांदेड) व श्री. राजू तातेराव राजेगोरे यांनी तक्रारदार श्री. केशव सखाराम राजेगोरे यांच्याकडून त्यांनी राष्ट्रीय पेयजल योजने अंतर्गत केलेल्या पाणी पुरवठाच्या कामाच्या धनादेशावर सही करण्याकरीता रु.१,००,०००/- इतकी लाचेची रक्कमेची मागणी करुन ती स्वीकारली असता, त्यांना दि. २६.०५.२०१५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाद्वारे पकडण्यात आले आहे. या संदर्भात त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन अर्धापूर जि.नांदेड गु.र.क्र. २१/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा,

१९८८ चे कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये दि.२७.०५.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोन्ही आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली. सद्य:स्थितीत मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

**मालाड (प), मुंबई येथील लिकिंग रोड या परिसरातील भूमी क्लासिक या खाजगी विकासकांच्या गृहप्रकल्पाच्या भूखंडाबाबत**

**(४) * १७७७१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (प), मुंबई येथील लिकिंग रोड या परिसरातील भूमी क्लासिक या खाजगी विकासकांच्या गृहप्रकल्पाचा भूखंड शासनाकडे जमा करण्याचे आदेश उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केले असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भूखंडाबाबत १९ वर्षापूर्वी विकासकासोबत झालेला करारही बेकायदा असल्याचा निर्णय देण्यात आल्यामुळे २५७ रहिवाशांची फसवणूक झाली आहे हे लक्षात घेता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौ.मालाड, ता.बोरीवली येथील स.नं.५०४ अ पै., न.भू.क्र.१४०६-जी/१ पै., क्षेत्र ८६१६.४० चौ.मी. ही मिळकत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (५) मधील तरतुदीनुसार शासन जमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक १३.०४.२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३६ अ च्या पोटकलम (४) अन्वये चौकशीसाठी विषयांकित ठिकाणच्या इमारतीमध्ये वास्तव्यास आलेल्या एकूण २५७ व्यक्तींना सामनेवाला म्हणून सुनावणीची संधी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिली आहे. तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक १३.४.२०१५ रोजीच्या आदेशाविरुध्द अपिल करण्याची संबंधितांना संधी आहे. त्याप्रमाणे भूमि क्लासिक को.ऑप.सो.लि. यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक १३.४.२०१५ रोजीच्या आदेशाविरुध्द अपर आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय रिलायन्स जिओ (Reliance GIO) या कंपनीने फोर जी केबलचे कामासाठी खोदकाम केल्याबाबत

**(५) * २०३५८ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय रिलायन्स जिओ (Reliance GIO) या कंपनीने फोर जी केबलचे जाळे टाकण्याकरिता संपूर्ण महानगरपालिकेच्या विविध रस्त्यांवर खोदकाम केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागाने विना परवानगी खोदकाम केल्याबाबत रिलायन्स जिओ कंपनीस १८ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, के/पूर्व विभागाप्रमाणेच महानगरपालिकेच्या इतर विभागाने सुध्दा विना परवानगी खोदकामाबाबत रिलायन्स जिओ कंपनीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, के/पूर्व विभागाने रिलायन्स जिओ कंपनीस ठोठावलेल्या उक्त दंडाच्या रकमेची वसूली केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) रिलायन्स जीओ कंपनीने विना परवाना खोदकाम केल्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के/पूर्व विभागाने त्यांना १७.८९ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

(३) के/पूर्व विभागाप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर विभागाने सुध्दा विना परवाना खोदकामाबाबत रिलायन्स जिओ कंपनीस एकूण रु.३,७४,८०,५५६/- दंड आकारला आहे. तसेच महानगरपालिकेच्या आर (मध्य) विभाग कार्यालयामार्फत रिलायन्स जीओ कंपनी विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दंड वसुलीची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मीरा रोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील एक्स-रे व सोनोग्राफी मशिन बंद असल्याबाबत**

**(६) * २१८१३ श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मीरा रोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी या ५० खाटांच्या रुग्णालयातील एक्स-रे व सोनोग्राफी ह्या दोन्ही चाचण्या सध्या बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भवती महिलांना महानगरपालिकेकडून मोफत चाचणी केली जात असून गरीब रुग्णांना याचा चांगला लाभ घेता येतो परंतु मशीन बंद असल्याने रुग्णांना सोनोग्राफी साठी बाहेरच्या महागड्या खाजगी चाचणी केंद्रांवर जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १५०० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असणाऱ्या महानगरपालिकेचे केवळ मीरा रोड येथेच रुग्णालय असून त्यातही पुरेश्या आरोग्य सेवा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

(२) नाही, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन सुरु असून त्याद्वारे गर्भवती महिलांची मोफत तपासणी करण्यात येते.

(३) व (४) नाही,

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील ५० खाटांच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात आरोग्यविषयक सुविधा नियमित स्वरुपात पुरविल्या जातात. याव्यतिरीक्त महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांच्या आरोग्य सेवेकरीता ७ आरोग्य केंद्रे, २ उपकेंद्रे व १ फिरता दवाखाना कार्यरत आहेत.

याखेरीज मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली असलेल्या २०० खाटांच्या पंडीत भिमसेन जोशी रुग्णालयाचे काम प्रगतीपथावर आहे. आगामी ३ महिन्यांत या रुग्णालयात ५० खाटांची व्यवस्था करण्याचे प्रयत्न महानगरपालिकेकडून सुरु असून याकरिता आवश्यक असलेल्या वैद्यकीय कर्मचारीवृंदाची नियुक्ती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ आकाशात पाच मानव रहित पॅराशुट गुढरित्या आढळल्याबाबत**

**(७) * १६५८९ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ आकाशात पाच मानव रहित पॅराशुट दिनांक २५ मे, २०१५ रोजी गुढरित्या आढळल्याने मुंबईच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ मानव रहित पॅराशुट आढळून आले नसून ते फुग्यांचे बनविलेले गुच्छ हवे मध्ये उडविण्यात आल्याचे आढळून आले आहे.

(२) एअर इंडिया स्पोर्टस क्लब, वाकोला, सांताक्रुझ पूर्व, मुंबई येथे डायमंड एक्सपोर्ट कंपनी व विविध बँका यांचे क्रिकेट मॅचचे आयोजन करण्यात आले होते. सदर मॅचकरीता बँकेचे प्रमुख पाहूणे आल्याने विविध रंगांच्या फुग्यांचे गुच्छ करुन त्यावर टिमचे नाव लिहिलेले फलक लावून हवेमध्ये सोडण्यात आलेले होते.

श्री.कुणाल रमेशभाई शहा व श्री.निलेश जयंतीलाल श्रीमानगर यांचे विरुध्द विमानतळ पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करुन त्यांना अटक करण्यात आली असून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गुडसूर शाखेची रक्कम लुटल्याबाबत

**(८) * २६७७९ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गुडसूर शाखेची रक्कम दुचाकीवरुन घेऊन जात असतांना कर्मचाऱ्यांवर रॉडने हल्ला करुन दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास रुपये ८ लाखांची रक्कम लुटली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित हल्लेखोरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद प्रकरणी फिर्यादीचे नाकावर लोखंडी रॉडने मारुन गंभीर जखमी केले व रु.७.०० लक्ष असलेली बॅग हिसकावून घेवून निघून गेल्याबाबत पोलीस स्टेशन वाढवणा जिल्हा लातूर येथे गु.र.नं. २६/१५ भा.दं.वि. कलम ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

(२) व (३) दाखल गुन्ह्याच्या तपासात उदगीर येथील ४ संशयीताच्या घराच्या झडत्या घेवून तपास केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखा लातूर यांचे खास पथक नेमून तपास करण्यात आला. गुन्ह्याचे घटनास्थळाचे मोबाईल डमडाटा काढून तसेच गुन्हा उघडकीस आणणेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. तथा अद्याप गुन्हा उघडकीस आलेला नाही. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

### अमरावती येथील महाराष्ट्र राज्य औद्यागिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) थकीत असलेल्या मालमत्ता कराबाबत

**(९) * १६८४८ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील महाराष्ट्र राज्य औद्यागिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) सुमारे साडे पाचशे उद्योजक, कारखानदार, व्यापाऱ्यांकडे थकीत असलेल्या १८ कोटी ४८ लाख रुपयांच्या मालमत्ता कराबाबत तोडगा निघाला नसून कराची रक्कम कमी करण्यात यावी या संदर्भात महानगरपालिकेने पाठविलेला प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती येथील एमआरडीसी क्षेत्र हे एकमेव असे क्षेत्र आहे की जे संबंधित महानगरपालिका हद्दीत येत असूनही त्याला कोणतीही सोयीसुविधा मिळत नाही असे असतांनाही कराचा भरणा उद्योजकांना करावा लागतो हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) अमरावती महापालिका हद्दीत असलेल्या एमआयडीसी क्षेत्रात अमरावती महापालिकेतर्फे दैनंदिन साफसफाईची आणि रस्त्यांची कामे केली जात आहेत.
(३) अमरावती महापालिकेकडून प्राप्त प्रस्तावावर शासनस्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**नागपूर येथील आसीनगर झोनअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या घरकुल योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(१०) * २००८२ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्यावतीने गोरगरिबाच्या विकासाकरिता घरकुल योजना हाती घेतली असून नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या या अभिनव योजनेच्या प्रकरणी १७ फाईल्स बनावट स्वाक्ष-या करुन घरकुल योजनेच्या आसीनगर झोनअंतर्गत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापी या प्रकरणी बनावट स्वाक्ष-या केल्याचे उघड झाल्यानंतरही कोणाच्याही विरोधात तक्रार दाखल करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, संबंधित दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी अध्यक्ष/सचिव सहारा बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांचे विरोधात पांचपावली पोलीस स्टेशन, नागपूर येथे आसीनगर झोन कार्यालयात या प्रकरणी तक्रार करण्यात आलेली आहे. पांचपावली पोलीस स्टेशन कार्यालयाकडून पुढील चौकशी सुरु आहे.

(३) वरील प्रमाणेच आसीनगर झोन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त आणि इतर अधिकारी यांचे वर उक्त प्रकरणी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली असून त्यानुसार पुढील आवश्यक कार्यवाही नागपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) दिवादांडी समुद्र किनाऱ्यांवर बंधाऱ्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(११) * २००५५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) दिवादांडी समुद्र किनाऱ्यांवर सुमारे ५०० मीटर लांब व रुपये ५ कोटी खर्चाच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांचे काम सुरु करण्यात आले असून अंदाज पत्रकानुसार होत नसून अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या १० वर्षात ३ वेळा बंधारा बांधण्यात आला मात्र किनाऱ्यांवर मोठे दगड टाकण्याऐवजी अत्यंत छोटे दगड टाकण्यात आल्याने दगड वाहून जावून भरतीचे पाणी वसाहतीमध्ये घुसून आतापर्यंत ६५ घरे उध्दवस्त झाली आहेत त्या घरांतील कुटूंबे बेघर झालेली असूनही शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सध्या सुरु असलेल्या कामाच्या ठेकेदारांने बंधारा बांधताना अंदाजपत्रकानुसार कुठलेही नवीन साहित्य खरेदी न करता तसेच नवीन मोठे दगड न वापरता सन २००४ मध्ये बीएसइएस कंपनीने बांधून दिलेल्या बंधाऱ्यांचे वाळू खाली गाडलेले छोटे दगड खणून ते कोसळलेल्या बंधाऱ्यांवर टाकले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १ ते ५ टन तसेच २० ते १०० आणि १०० ते २०० किलो वजनाच्या दगडांचा वापर करण्याबाबत अंदाजपत्रकात सुचीत करण्यात आले असून दीड मीटर खोल खोदून दगड रचले जाणे आवश्यक असतानाही यापैकी कोणत्याही बाबींची पूर्तता ठेकेदारांकडून झालेली नसल्याने भरतीमुळे बंधाऱ्यांची धूप होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण गैरकारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. कारण सन २००१-२००२ मध्ये BSES मार्फत साखळी क्र. ० ते ७०० मी. बंधारा बांधणेत आला होता. उर्वरित ७०० मी.लांबीच्या धुप प्रतिबंधक बंधा-याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन सदर काम निधी उपलब्धतेनुसार पत्तन अभियंता, कोकण भवन यांचेमार्फत करण्यात आले. सदर कामाची अंमलबजावणी CWPRS, पुणे यांनी दिलेल्या काटछेदानुसार करण्यात आली.

(३) व (४) हे खरे नाही. सदर कामाची अंमलबजावणी CWPRS, पुणे यांनी दिलेल्या काटछेदानुसार करण्यात आली असून आवश्यक खोदाई व वेगवेगळ्या थरांसाठी १० ते १००० किलो पर्यंत वजनाचे दगड वापरुन काम करण्यात येत आहे. सदर काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे काम पुर्ण झाल्यानंतर भरतीमुळे बंधा-याची धूप होणार नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आस्टुल (ता.पातूर, जि.अकोला) येथील इंगळे कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह शेतात आढळल्याबाबत

**(१२) * १६७५३ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आस्टुल (ता.पातूर, जि.अकोला) येथील इंगळे कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह शेतात आढळल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हत्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, पातूर येथे अकस्मात मृत्यू क्र.०७/२०१५ सी.आर.पी.सी. चे कलम १७४ अन्वये पंचनामा करण्यात आला. तेव्हा असे आढळून आले की, या प्रकरणात श्री.संजय इंगळे यांनी आपल्या दोन्ही मुलांना प्रथम शेतात नेऊन मुलगा रोशन याचा गळफास देवून व मुलगी मयुरी हिचा गळा दाबून त्यांची हत्या केली.

तद्नंतर पत्नी मनिषा व दुसरी मुलगी ऐश्वर्या यांना शेतात नेऊन पती-पत्नींनी मुलगी ऐश्वर्या हिचा गळा दाबून तिची हत्या केली. नंतर पती-पत्नी यांनी आंब्याच्या झाडाला वेगवेगळ्या ठिकाणी दोराच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.

या प्रकरणी पोलीस स्टेशन, पातूर येथे गु.र.क्र. ५०/२०१५ भा.दं.वि. कलम ३०२, ३०४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कुर्ला (मुंबई) येथील शूर संभाजी गृहनिर्माण संस्थेबाबत

**(१३) * २२२२५ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुर्ला (मुंबई) येथील शूर संभाजी गृहनिर्माण संस्था (नियो) येथील रहिवाश्यांना मा.उपजिल्हाधिकारी कुर्ला (अति/निष्का) यांनी संक्रमण शिबिर अथवा भाड्याची रक्कम प्राप्त झाली किंवा नाही याची खात्री न करता दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजी २४ तासांच्या आत खोलीचे निष्कासन करण्याबाबत नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नोटीसा बजावल्यानंतर दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी खोल्यांचे निष्कासन करण्याची कार्यवाही करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुर संभाजी गृहनिर्माण संस्था (नियो) मधील रहिवाश्यांनी या योजनेमध्ये काही तांत्रिक अडचणी व शंका असल्यामुळे उच्च न्यायालयात दावा केला असता खंडपीठाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी राहण्याची व्यवस्था अथवा भाड्याची रक्कम दिल्यानंतर घर रिकामे करण्याबाबतचे आदेश दिले असतांनाही सदर आदेशाला धुडकावून तद्पूर्वीच मा.उपजिल्हाधिकारी कुर्ला (अति/निष्का) यांनी घरे निष्कासित केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.गृहनिर्माण मंत्री, पोलीस आयुक्त, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, एसआरए, जिल्हाधिकारी, मुंबई यांना स्थानिक रहिवाश्यांनी दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार करुनही अद्यापि कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे कुर्ला येथील न.भू.क्र.७१,७१/१ ते २६२,७६,७६/१ ते २७ या मिळकतीवर वसलेल्या प्रस्तावित शुर संभाजी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने, महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ नुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेत सहभागी होण्यास नकार दिलेल्या सहा झोपडी धारकांविरुध्द उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.), कुर्ला यांनी दि.२६.२.२०१५ रोजी निष्कासनाची कार्यवाही केली.

सदर निष्कासनापुर्वी संबंधित झोपडीधारकांना भाड्याच्या रकमेचे धनादेश वितरित करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही. संबंधित झोपडीधारकांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२४२७/२०१४ व रिट याचिका (लॉजींग) क्र.२५९/२०१५ दाखल केली होती. सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने खारीज केल्या आहेत. तथापि, रिट याचिका (लॉजींग) क्र.२५९/२०१५ मध्ये दि.४.२.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित झोपडीधारकांना निष्कासनापूर्वी घर भाड्याची रक्कम अदा करण्यत आली आहे.

(४) व (५) प्रस्तूत प्रकरणी संबंधित झोपडीधारकांना निष्कासनापुर्वी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार घर भाड्याची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मा.मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातील सदनिका वाटप मंजूरीचे आदेश गहाळ झाल्याबाबत

**(१४) * २५७५२ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोटयातील सदनिका वाटप संबंधित सन १९८२ पासूनच्या नस्त्यांमधून मुख्यमंत्र्यांनी दिलेले सदनिका वाटप मंजूरीचे आदेश गहाळ झाले असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भातील सुमारे १ हजार ३०० नस्त्या मिळत नसल्याची माहिती शासनाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरविकास विभागाच्या सुमारे ३ हजार गृहनिर्माण विभागाच्या सुमारे २१३ नस्ती गहाळ झाल्याची माहिती अलिकडेच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मा.मुख्यमंत्री यांच्या ५% स्वेच्छाधिकार कोट्यातून सन १९८२ पासून वाटप झालेल्या सदनिका बाबतच्या १७५९ प्रकरणामध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांचे आदेश उपलब्ध होत नाहीत. तथापि सदनिका वाटपाचे शासन स्तरावरुन निर्गमित झालेले आदेश सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत. याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई समोर प्रलंबित असलेली फौजदारी जनहित याचिका क्रमांक २/२०१२ संदर्भात जानेवारी २०१४ मध्ये सक्षम प्राधिकारी, नागरी समूह व म्हाडा यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे मा.न्यायालयामध्ये दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये ५ % स्वेच्छाधिकार कोट्यातून सुमारे १२,२२० तर २ % कोट्यातून सुमारे १,३०० सदनिकांचे वाटप करण्यात आल्याचे नमूद केलेले होते. त्यापैकी शासन स्तरावरुन ५ % सदनिका वाटपाबाबतच्या ९,२०४ तर २ % वाटपाबाबतच्या १,०८७ एवढ्या उपलब्ध नस्त्या मा.उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या एक सदस्यीय चौकशी समितीकडे सादर केलेल्या आहेत.
(४) व (५) चौकशी समितीकडे उपलब्ध करुन द्यावयाच्या उर्वरित नस्त्या सन १९८२ पासूनच्या कालावधीतील जुन्या असून या कालावधीतील कर्मचा-यांच्या बदल्याही झालेल्या आहेत आणि बराच प्रयत्न करुनही या नस्त्या उपलब्ध होत नसल्याचा सविस्तर खुलासा नगर विकास विभाग व गृहनिर्माण विभागाने एक सदस्यीय समितीकडे सादर केलेला आहे. सदर खुलासा समितीने स्वीकारला असल्याचे समितीचे सचिवांनी दि.७.५.२०१५ अन्वये कळविलेले आहे. त्यामुळे या प्रकरणांत चौकशी वा दोषींवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील सुभाषनगर, पोखरण रोड क्र. २ येथील शासकीय जमिनीवर महाकाली डेव्हलपर्स नामक विकासकाने परवानगी न घेता केलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(१५) * २७२५३ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील सुभाषनगर, पोखरण रोड क्र. २ येथील सर्व्हे क्रमांक ५०९ व ५०१० या शासकीय जमिनीवर महाकाली डेव्हलपर्स नामक विकासकाने झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचे शासनाकडून कोणतीही परवानगी न घेता काम सुरु केले असून

या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व मा.गृह राज्यमंत्री तसेच दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी मा.सहकार मंत्री व मा.सहकार राज्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१८.१२.२०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना व मा.गृहराज्यमंत्री यांना निवेदन दिले आहे. तसेच दि.२२.११.२०१४ रोजी मा.मंत्री, सहकार व मा.राज्यमंत्री (सहकार) यांना निवेदन दिले आहे.
(२) मा.विधानसभा सदस्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना व मा.गृहराज्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने नगर विकास विभागास ठाणे महानगरपालिकेने त्यांचा अहवाल सादर केला असून नगर विकास विभागाकडे त्याची तपासणी सुरु आहे.

तसेच मा.मंत्री, सहकार यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (सहकार) यांनी सदर संस्थेच्या दप्तर तपासणीची कार्यवाही करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८९ (अ) अन्वये दि.२१/०५/२०१५ रोजी सहकारी अधिकारी (श्रेणी-२) यांची नियुक्ती केली असून संबंधित संस्थेच्या दप्तर तपासणीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव शहरातील घरकुल योजनेतील घरे काही पालिका कर्मचा-यांनी बळकावल्याबाबत

**(१६) * २५२९० श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव शहरातील शिवाजीनगर, गेंदालाल मिल तसेच विविध ठिकाणी गरिबांसाठी बांधण्यात आलेल्या घरकुल योजनेतील घरे काही पालिका कर्मचा-यांनी हडप केल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या ८२ कर्मचा-यांचा यात समावेश असून या कर्मचा-यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार गरिबांना घरे मिळवून देण्याबाबत पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जळगांव शहरामधील झोपडपट्टीमध्ये रहिवास करणा-या झोपडी धारकांसाठी घरकुलाची योजना जळगाव शहर पालिकेद्वारे राबविण्यात आली. यामध्ये घरकुल योजनेच्या सेवाशुल्क रजिस्टरमधील नोंदीनुसार घरकुल वाटप करण्यात आलेल्या लाभधारकांमध्ये ८२ महानगरपालिका कर्मचा-यांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) या ८२ कर्मचा-यांना ते सदर योजनेचे लाभार्थी असल्याची खातरजमा करण्याकरिता त्यांना मे २०१५ मध्ये महानगरपालिकेने नोटीसा देऊन लाभधारकतेच्या पात्रता/ निकषासंदर्भातील कागदपत्रे त्यांचेकडून मागवण्यात आली आहेत.

(३) सदर ८२ कर्मचा-यांच्या लाभधारकतेच्या पात्रता /निकषासंदर्भातील कागदपत्रे, तसेच कार्यालयीन अभिलेख यांची तपासणी करुन महानगरपालिका स्तरावर पुढील योग्य ती कार्यवाही एक महिन्यात करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलीसांच्या समाजसेवा शाखेने मुंबईतील बारवर केलेली कारवाई

**(१७) * १७५३३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ येथील स्टार नाईट, अंधेरीतील क्लासिक, बोरिवलीतील जश्न आणि भायखळा येथील आंगण बार अॅड रेस्टारंटवर मुंबई पोलीसांच्या समाजसेवा शाखेने कारवाई करुन ४४ बारबालासह १६७ जणांना अटक केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बारमध्ये रात्री उशीरापर्यंत काही बारबालांना कामावर ठेवून त्यांना तिथे येणा-या ग्राहकांशी अश्लील कृत्य करण्यास प्रवृत्त करण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन या बारमालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. तथापि, सदर प्रकरणी मुंबई पोलीसांच्या समाजसेवा शाखेने ४४ बारबालासह १६२ जणांना अटक केली आहे.

(२) हे खरे नाही. समाजसेवा शाखेने केलेल्या कारवाया ह्या बार आस्थापनांच्या परवान्यातील विहीत वेळेमध्ये केलेल्या आहेत.

(३) व (४) सदर प्रकरणी स्टार नाईट बार ॲन्ड रेस्टॉरंट या आस्थापनेविरुध्द सांताक्रुझ पोलीस ठाणे येथे दि.१२/०४/२०१५ रोजी गु.र.क्र.१८१/२०१५ अन्वये, क्लासिक बार ॲन्ड रेस्टॉरंट या आस्थापनेविरुध्द अंधेरी पोलीस ठाणे येथे दि.११/०४/२०१५ रोजी गु.र.क्र.१९९/२०१५ अन्वये, जश्न बार ॲन्ड रेस्टॉरंट या आस्थापनेविरुध्द कस्तुरबा पोलीस ठाणे येथे दि.०९/०४/२०१५ रोजी गु.र.क्र.११२/२०१५ अन्वये आणि आंगण बार ॲन्ड रेस्टॉरंट या आस्थापनेविरुध्द भायखळा पोलीस ठाणे येथे दि.०७/०४/२०१५ रोजी गु.र.क्र.१३६/२०१५ अन्वये वरील सर्व प्रकरणात भा.दं.वि. कलम २९४, ११४, ३४ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३ (डब्ल्यू) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

उपरोक्त नमूद सर्व गुन्ह्यांमध्ये बार मालक/चालक, बारबाला व गिऱ्हाईक आणि बारचे कर्मचारी यांना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल सामन्यांच्या वेळी पुरविलेल्या पोलीस बंदोबस्तासाठीची थकबाकी न मिळाल्याबाबत

**(१८) * १६३२० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर आयपीएल (इंडियन प्रिमीअर लीग) सामन्याच्या माहे एप्रिल, २००८ ते २०१४ या कालावधीत खेळल्या गेलेल्या ७ सत्रातील अनेक सामन्यांना मुंबई पोलीसांनी पुरविलेल्या बंदोबस्तापोटीचे ५५ कोटी रुपये अद्यापही गृह विभागाला मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत तसेच थकबाकी वसुल करण्याच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. मुंबई येथील वानखेडे स्टेडीयम येथे खेळल्या गेलेल्या आयपीएल (इंडियन प्रिमियर लिग) सामन्यांकरिता मुंबई पोलीस दलाकडून पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताची रक्कम शासकीय देय दरानुसार रुपये ५५ कोटी नसून रुपये १६,३४,२९,६४२/- एवढी आहे. सदरची रक्कम संबंधित आयोजकांकडून वसूल करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली, मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील शहरामध्ये रिलायन्स इन्फोकॉम या केबल नेटवर्क कंपनीने केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१९) * २३१२६ श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली, मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील शहरामध्ये रिलायन्स इन्फोकॉम या केबल नेटवर्क कंपनीने केबल टाकण्याच्या कामामध्ये (महानगरपालिकेशी केलेल्या करारानुसार) करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतीत शासनाने चौकशी करुन काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई शहराच्या निर्मिती करीता संपादीत केलेल्या जमिनीच्या प्रकल्पग्रस्तांना लाभ मिळण्याबाबत

**(२०) * १७०५४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराच्या नियोजनबध्द निर्मितीसाठी शासनामार्फत ठाणे, उरण व पनवेल तालुक्यातील संपादित केलेल्या ९५ गावातील शेतक-यांच्या जमिनीचा मोबदला म्हणून सिडकोमार्फत साडेबारा टक्के विकसित भूखंड देण्याचा निर्णय घेऊन ४० वर्षे झाली तरी अद्यापही २० टक्के प्रकल्पग्रस्तांना त्याचा लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार उर्वरित २० टक्के प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित भुखंडांचे वाटप तात्काळ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर विकसित भुखंडाचे वाटप किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

ठाणे, पनवेल आणि उरण तालुक्यातील मिळून १२.५ टक्के योजनेअंतर्गत साधारणपणे ८७८.२० हे. क्षेत्र देय असून यापैकी ८०.०५ टक्के क्षेत्र भूधारकांना प्रत्यक्ष ताब्यात देण्यात आले आहे. उर्वरित इरादित करण्यात आलेल्या भूखंडाबाबत कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला होता. त्यानुसार २७६९ भूखंडापैकी ३५१ भूखंड वाटप करण्यात आले व उर्वरित प्रकरणांबाबत वारस दाखला व अन्य कारणासाठी भूखंड वाटप प्रलंबित आहेत. तसेच इरादित न करण्यात आलेल्या भूधारकांसाठी कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) १२.५ टक्के योजनेमध्ये भूधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणे व इतर न्यायालयीन बाबीमुळे भूखंड वाटपाच्या प्रक्रियेला विलंब होत आहे.

-----------------

## कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मानसरोवर कॉम्प्लेक्समधील अनेक सदनिकाधारक व गाळेधारकांची फसवणूक केल्याबाबत

**(२१) * २३६१७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील मानसरोवर कॉम्प्लेक्समधील अनेक सदनिकाधारक व गाळेधारकांची फसवणूक करणाऱ्या विकासकाविरोधात दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी विकासकाच्या कार्यालयावर व सिडको कार्यालयावर मोर्चा काढला असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामोठे येथील भूखंड क्र. १, २, ४, ५, १९ ते २६, सेक्टर ३४ या जागेवर विकासक जेम्स डिसील्वा यांनी सन १९९९ पासून इमारती बांधल्या असून सदनिका व दुकान गाळेधारकांना आवश्यक सोयी सुविधा पुरवितांना परवानग्या घेतलेल्या नसल्यामुळे सदनिकाधारक व गाळेधारकांची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदरचा भूखंड हा प्रकल्पग्रस्त शेतकरी श्रीमती उमाबाई सुर्यकांत पुराणिक व इतर यांचे नावे असून अद्याप तो मानसरोवर कॉम्प्लेक्सच्या नावे हस्तांतरीत झालेला नाही. भूखंड धारकास दि.६.१२.२००० रोजी बांधकाम परवानगी देण्यात आली होती. मात्र, २.१० कोटी रुपयांचा पायाभूत सुविधा आकार सिडकोकडे जमा केलेला नसल्याने भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. तथापि, दि.२८.८.२००३ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आल्याने बांधकाम सुरु असताना इमारतीस १ नळ जोडणी तात्पुरत्या स्वरुपात व्यापारी दराने देण्यात आली आहे. सुविधा पुरविण्याच्या बाबतीत सदनिका धारकांची व गाळे धारकांची फसवणूक झाली असल्याची तक्रार सिडकोकडे प्राप्त झालेली नाही. तसेच त्रयस्त करारनामा न झाल्याने सिडकोच्या अभिलेखामध्ये विकासकाची नोंद नाही. मानसरोवर कॉम्प्लेक्समधील रहिवाशांनी सोसायटी स्थापन करण्यासाठी सिडकोकडून परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे भूखंडांचे अभिहस्तांतरण झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक शहरात आघाडीच्या वृत्तपत्र कार्यालयावर हल्ला करुन पत्रकारास मारहाण केल्याबाबत

**(२२) * २५८८६ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात सुरु असलेल्या अवैध धंद्याविरोधात बातमी दिल्यामुळे शहरातील एका आघाडीच्या वृत्तपत्र कार्यालयावर अज्ञात व्यक्तींनी हल्ला करुन बातमी देणाऱ्या संदीप जाधव या पत्रकारास मारहाण केली असल्याची बाब दिनांक १४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या संबंधित आरोपीवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे, तसेच पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले रोखण्याबाबत व त्यांना संरक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) दि. १४.६.२०१५ रोजी दैनिक दिव्य मराठी या वर्तमानपत्राचे चांडक सर्कल, नाशिक येथील कार्यालयात श्री.संदीप जाधव या पत्रकारास मारहाण झाली, हे खरे आहे. सदर प्रकरणी दि. १४.६.२०१५ रोजी सरकारवाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १८८/२०१५ भादंविक ४५२, ३२६, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी चार आरोपींना दि. १४.६.२०१५ रोजी अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

मागणी केल्यास पत्रकारांना उचित संरक्षण पुरविण्यात येते. पत्रकारांवरील हल्ल्यासंदर्भात कायद्याच्या मसुद्यावर विचार करुन शिफारशी करण्याकरिता माजी मंत्री, उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालाबाबत निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या बंदरात आयात केल्या जाणाऱ्या क्रुड तेलावर मुंबई पोर्ट ट्रस्टमार्फत करण्यात येत असलेली जकात वसुली

**(२३) * २६३५५ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या बंदरात आयात केल्या जाणाऱ्या क्रुड तेलावर आकारण्यात येणाऱ्या जकातीची वसुली संबंधीत आयातदार तेल कंपनीकडून न करता ती वसुली मुंबई पोर्ट ट्रस्ट कडून केली जात असून त्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून पोर्ट ट्रस्टला ३ टक्के कमिशन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने सन २००५-२००६ ते २००९-२०१० या कालावधीत मुंबई पोर्ट ट्रस्टने वसुल केलेल्या जकातीसाठी ८२ कोटी रुपये कमिशन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे मुंबई महानगरपालिकेचे दरवर्षी कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत असल्याने आयातदार कंपनीकडून थेट जकात वसुली करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ पूर्वी आयातदार तेल कंपनीकडून जकातीची वसुली मुंबई बंदर विश्वस्त यांजकडून करण्यात येत होती. बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई बंदर विश्वस्त यांच्या मधील करारानुसार मुंबई बंदर विश्वस्त यांना जकात वसुलीच्या रकमेच्या ३% दराने रक्कम देण्यात येत होती. तथापि तद्नंतर सदर जकात वसुली मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. त्यामुळे मुंबई बंदर विश्वस्त यांना ३% दराने रक्कम देण्यात येत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) मुंबई महानगरपालिकेने मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या कंपनीबरोबर पत्रव्यवहार करुन मुंबईत आयात करण्यात येणा-या कच्च्या तेलावरील जकातीची रक्कम महानगरपालिकेकडे भरण्याबाबत केलेल्या विनंतीस होकार देऊन दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ पासून जकातीचा भरणा मुंबई महानगरपालिकेच्या तिजोरीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई विकास आराखडा बनविणा-या कंपनीकडून १२ कोटी रुपये वसुल करण्याबाबत**

**(२४) * २१२६९ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत एस.सी.इंडिया लि. या कंपनीला मुंबईचा विकास आराखडा बनविण्याचे काम देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने घेतलेली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पडलेली नसून हेच काम एजिस जिओप्लान या एजन्सीला देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोन्ही कंपनीला मिळून डीपी कामासाठी १२ कोटी रुपये देण्यात आले होते परंतु, त्यांनी मोबदला घेऊनही काम केले नाही, त्यामुळे विकास आराखडा वादग्रस्त ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कपंनीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर दोन्ही कंपनीकडून देण्यात आलेला मोबदला वसूल करुन त्यांच्यावर कोणती कठोर कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) अद्यापपर्यंत कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) मेसर्स इजिस जिओ प्लान प्रा.लि. या कंपनीने मे, ग्रुप एस.सी.ई.इंडिया लि.ही कंपनी ताब्यात घेतलेली आहे. कंपनी च्या नावात कंपनी कायद्यातील तरतूदीनुसार बदल झालेला आहे. अटी/शर्ती कायम ठेवून मेसर्स इजिस जिओ प्लान प्रा.लि. यांचेबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेने करार केलेला आहे.

(३) नाही.

(४), (५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेने आजमितीपर्यंत एकुण देय असलेल्या रु.१०,८३,८३,८२८/- रक्कमेपैकी ३,४१,८९,०२८/- इतक्या रक्कमेचे प्रदान केलेले आहे. उक्त देय असलेल्या रक्कमेव्यतिरिक्त रु. २ कोटी रक्कम ही वैकल्पिक सेवेकरिता अतिरिक्त रक्कम म्हणून नामनिर्देशित करणेत आलेली होती. त्याबाबतचा करारनामा करण्यात आलेला नाही.

सदर कंपनीसोबत केलेला करारनामा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुदतपूर्व बंद (Foreclosed) करण्यात आलेला आहे.

सल्लागाराने केलेल्या कामाबाबत शहानिशा केल्यानंतर पुढील कार्यवाहीबाबतचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून घेणेत येणार आहे.

-----------------

**बेटावद (ता. शिंदखेडा, जि.धुळे) येथे एकाच रात्री ६ ठिकाणी चो-या झाल्याबाबत**

**(२५) * १६५०९ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस. अहिरे (साक्री), ॲड. के.सी. पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमीन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेटावद (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथे दिनांक ६ मे, २०१५ रोजी एकाच रात्री ६ ठिकाणी चो-या होऊन लाखोंचा ऐवज लंपास झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तपास केला आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ०४/०५/१५ ते ०६/०५/१५ या कालावधीत नमूद ठिकाणी एकविरा ज्वेलर्स दुकानातून रु.१,४९,५००/- किंमतीचे दागिने व रोख रक्कमेची चोरी केली त्याच ठिकाणी जैन मंदिराचे दरवाज्याचे कुलुप तोडून दान पेटीतील चोरुन नेले तिस-या घटनेत राहत्या घराचे कुलुप तोडून कपाटातील ५२,०००/- किंमतीने दागिने चोरुन नेले अशा चोरीच्या घटना घडल्या असून त्याच गावात २ घटनेत चोरीचा प्रयत्न झाला नसून माल चोरीला गेला नाही.

(२) प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन नरडाण पोलीस स्टेशन, जि.धुळे येथे गु.र.नं. ३२/२०१५ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि.०६/०५/१५ रोजी गुन्हा दाखल करुन अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासात अज्ञात चोरट्यांचा शोध घेणेकामी लागलीच श्वान पथक व अंगुली मुद्रा तज्ञ यांना पाचारण करण्यात आले. घटनास्थळावर अज्ञात चोरट्याचे अंगुली मुद्रा मिळून आली नाही तथा श्वान पथकांस अज्ञात चोरट-यास सुगावा लागत नाही. तसेच बेटावद गावांतील मेनरोड वरील दुकानांत लावलेल्या सीसीटीव्हीचे फुटेज प्राप्त केले. त्यात तीन इसम मोटार सायकलीवर संशयीतरित्या जातांना दिसले त्यावरुन सदर फुटेजचे फोटो तयार केले परंतु फोटो अतिशय अस्पष्ट आल्याने अज्ञात चोरट्यांच्या तपासाच्या दृष्टीने काही एक उपयुक्त माहिती मिळून आली नाही. स्थानिक हिस्टीशिटरची घरझडती घेण्यात आली परंतु गुन्हयातील गेला माल हस्तगत झाला नाही अथवा गुन्हयालायक काही एक विशेष माहिती मिळून आली नाही.

गुन्हयाचा तपास सुरु असून अज्ञात आरोपीताचा शोध घेणेवर प्रलंबित आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मानखुर्द (मुंबई) येथील मैदानाचा राखीव भूखंड हडप केल्याबाबत

**(२६) * २३३६५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर पूर्व परिक्षेत्रातील मानखुर्द (मुंबई उपनगर जिल्हा) येथील अण्णाभाऊ साठे नगर परिक्षेत्रातील सुमारे २० ते २५ गुंठे क्षेत्रफळाच्या राखीव मैदानाच्या मोकळ्या भूखंडावर भूमाफियांनी जागा हडप करण्याचा केलेला प्रकार तसेच भू माफियांचा स्थानिक नागरिकांना होणारा त्रास थांबविण्याबाबतची मागणी तेथील नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (गृहनिर्माण), मा.राज्यमंत्री (नगरविकास), मुख्य सचिव (गृहनिर्माण), मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा), पोलीस आयुक्त बृहन्मुंबई पोलीस संबधित परिमंडळाचे पोलीस उपायुक्त, संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकडे दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली व येत आहे, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण झालेले नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या “एम/पूर्व” विभागाच्या विकास आराखड्यानुसार अण्णाभाऊ साठे नगर या परिक्षेत्रात कोणताही राखीव मैदानाचा भुभाग येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सन २००० पर्यंतच्या वैध झोपड्यांचा वरचा मजला नियमित करण्याबाबत

**(२७) * २५०१३ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सन २००० पर्यंतच्या वैध झोपड्यांमधील झोपड्यांचा वरचा मजला नियमित करण्याचे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानंतर वरच्या मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरुलाही एसआरए योजनेमध्ये घर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने अंमलबजावणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील सन २००० पर्यंतच्या वैध झोपड्यांमधील झोपड्यांचा वरचा मजला नियमित करण्याबाबतचे मा.मुंबई उच्च न्यायालयाचे कोणतेही आदेश गृहनिर्माण विभागाकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे झोपड्यांचा वरचा मजला नियमित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय दि.११ जुलै, २००१ मधील परिच्छेद क्र.४(५) मध्ये झोपड्यातील पोटमाळे/मजले यामध्ये वास्तव्य करणा-या झोपडीवासियांना स्वतंत्र/वेगळे ओळखपत्र देता येणार नाही, अशी तरतुद आहे. सदरहू तरतुदीच्या आधारे सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून दि. २८ जुलै, २०११ रोजीच्या आदेशान्वये अपात्र ठरविलेल्या प्रकरणी तसेच शासन निर्णय दि.११ जुलै, २००१ मधील उक्त तरतुदीस मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२१९०/२०१२ व २१६५/२०१२ अन्वये आव्हान दिले असून प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे बनावट पेपर विकणा-या टोळीला अटक केल्याबाबत

**(२८) * २६०६६ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (MPSC) बनावट प्रश्न पत्रिका रुपये १५ लाखात विकणाऱ्या आठ जणाच्या टोळीला गुन्हे शाखेच्या पोलीसांनी औरंगाबाद येथून अटक केली असून यामध्ये सहा विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

यामध्ये १५ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये ७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

(२) होय, प्रकरण पोलीस ठाणे मुकुंदवाडी, औरंगाबाद येथे गु.र.नं. ३७४/२०१५, भा.दं.वि. कलम ४२०, १०७, १०९, ११४, २० (ब), ३४ सह महाराष्ट्र विद्यापीठ शिक्षण मंडळ आणि इतर परिक्षा मधील गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा १९८२ चे कलम ३(२), ४(२), ५(२), ६ व ८ सह आय.टी. ॲक्ट चे कलम ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करुन चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर गुन्ह्यातील १५ आरोपींनी गुन्हा केल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आले असून त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या हद्दीतील नेतीवली येथील प्रबोधनकार शाळेत शैक्षणिक साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(२९) * १९९३८ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या हद्दीतील नेतीवली येथील प्रबोधनकार शाळा क्र.१९ येथील शाळेत शालेय विद्यार्थ्यांचे बुट, वह्या, दप्तरे इत्यादी शैक्षणिक साहित्यांचा साठा वापराविना तसाच शिल्लक असून सदरील साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे पाहणीमध्ये स्पष्ट झाल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही,
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेने प्रत्येक नागरी सुविधा पुरविण्यासाठी खाजगी कंपन्यांना कंत्राट देण्याचे धोरण सुरु केल्याबाबत

**(३०) * २२०९९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने प्रत्येक नागरी सुविधा पुरविण्यासाठी खाजगी कंपन्यांना कंत्राट देण्याचे धोरण सुरू केले असून सदर कंपन्या सुविधा देण्याच्या नावाखाली शहरातील कचरा उचलण्याचे कंत्राट मिळालेल्या कनक रिसोर्सिस मॅनेजमेंट कंपनीने सादरीकरण केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कंपनीने रिकाम्या वाहनाच्या वजनात फेरफार करून महानगरपालिकेचे सुमारे १० कोटी रूपयांचे नुकसान केल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेतील कचरा गैरव्यवहाराच्या चौकशीकरीता उपायुक्ताच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यीय समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समितीने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नागपूर शहरातील कचरा उचलण्याचे कंत्राट कनक रिसोर्सिस मॅनेजमेंट कंपनीस देण्यात आले आहे हे खरे आहे.
(२) कचरा उचल करणा-या रिकाम्या वाहनाचे प्रत्यक्षात असलेले वजन व संगणक आज्ञावलीमध्ये असलेल्या रिकाम्या वाहनाच्या वजनामध्ये तफावत दिसून आली.

वजनामध्ये आलेला फरक गृहीत धरुन अतिरिक्त प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेचे आकलन करुन रक्कम वसूल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(३) होय.
(४) प्रस्तुत प्रकरणात चौकशीअंती महापालिकेकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

सदर चौकशीमध्ये कंपनीच्या रिकाम्या वाहनांच्या वजनात सरासरी १०५.६४ कि.ग्रॅ. वजनाची तफावत आढळून आली असून अतिरिक्त प्रदान करण्यात आलेल्या वास्तवीक रक्कमेचे आकलन करुन रक्कम वसूल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

तसेच मे.मॅट्रिक इंजिनियरर्स ॲन्ड कन्सलटंट या एजन्सीकडे संगणक आज्ञावलीची देखरेखीचे काम असल्यामुळे त्यांना नोटीस बजावून त्यांच्या वार्षिक देखभाल खर्चाकरिता कंपनीस देय असलेली शिल्लक रक्कम गोठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वरील बाबीवर पूर्णत: देखरेख ठेवण्याची जबाबदारी त्या ठिकाणी कार्यरत करणा-या स्वास्थ निरिक्षकाची असल्याचे त्यांना व तेथे कार्यरत सहा कर्मचा-यांना नोटीस बजावण्यात आली असून नियमानुसार योग्य कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील जुन्या महानगरपालिका क्षेत्रातील १८ वार्डांना पाणी पुरवठा करणा-या हर्सुल तलावातील गाळ काढण्याबाबत

**(३१) * २७२९२ श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील जुन्या महानगरपालिका क्षेत्रातील १८ वार्डांना पाणी पुरवठा करणा-या हर्सुल तलावातील गाळ काढणेसाठी शासनाने मनपाला २ कोटी रु. दिले व पावसाळा सुरु होणेपूर्वी गाळ काढण्याचे काम पुर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली होती, परंतु पावसाळा सुरु झाला तरीही मनपाने गाळ काढण्याचे काम सुरु केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मनपाला दिलेली २ कोटीची रक्कम इतरत्र वापरण्याची परवानगी शासनाला मागितली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हर्सुल तलावातील गाळ व्यावसायिकांच्या माध्यमातून विकला जात असून शेतकऱ्यांना मोफत गाळ देण्याचे शासनाचे धोरण असतांना, केवळ महानगरपालिकेच्या धोरणामुळे शेतक-यांना गाळ विकत घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने जबाबदार अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

सन २०१३ मध्ये मा.मुख्यमंत्री सहाय्यतानिधीतून (दुष्काळ २०१३) हर्सुल तलावातील गाळ काढण्यासाठी शासनाने रु.२ कोटी इतकी रक्कम औरंगाबाद महानगर पालिकेला दिली होती. सदर कामाच्या निविदेची कार्यवाही पुर्ण झाली असून स्थायीसभेच्या मान्यतेनंतर महानगरपालिकेमार्फत काम सुरु करण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर शहरातील जयंती नाल्यातून प्रदूषित पाणी पंचगंगा नदीत मिसळत असल्याबाबत**

**(३२) * २४४१८ श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचगंगा नदी प्रदूषण प्रकरणी कोल्हापूर महानगरपालिकेचा ७६ दशलक्ष लिटरचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्यापही पूर्ण झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) कोल्हापूर शहरातील जयंती नाल्यातून प्रदूषित पाणी पंचगंगा नदीत मिसळत असल्याने सन १९९७ मध्ये प्रदूषण रोखण्याचे मा.उच्च न्यायालयाने प्रदूषण रोखण्याचे महानगरपालिकेला निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचगंगा नदी प्रदुषणात कारणीभूत ठरत असलेले सहकारी साखर कारखाने व इतर औद्योगिक आस्थापनावर सुनावणी होऊन कार्यवाही प्रस्तावित झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील कारखाने व औद्योगिक आस्थापनावर कार्यवाही करण्याच्या सूचना न्यायालयाने दिल्या आहेत काय, याबाबत संबंधित कारखाने व आस्थापनांवर आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली जाईल असा इशारा प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी यांनी माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.
कोल्हापूर महानगरपालिकेकडून ७६ दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत या प्रकल्पाद्वारे ६० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.
(२) होय. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.९७९/१९९७ मध्ये दि.२९/१/१९९८ अन्वये प्रदुषण रोखण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
(३) होय. पंचगंगा नदीच्या प्रदूषणास कारणीभूत असलेल्या सहकारी साखर कारखाने व इतर औद्योगिक आस्थापनांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) होय. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१८३/२०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार संबंधित आस्थापनांवर फौजदारी दावे दाखल करणे, नोटीसा देणे, बँक हमी घेणे व जप्त करणे इत्यादी कार्यवाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करण्यात आली आहे.
(५) प्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी महानगरपालिका हद्दीतील नाल्यातून काही प्रमाणात चालू असलेला सांडपाण्याचा विसर्ग न थांबल्यास फौजदारी कार्यवाही करण्यात येईल, असे सूचित केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बेस्ट उपक्रमाला होणारा तोटा भरून काढण्याबाबत**

**(३३) * १७३७८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील बेस्ट उपक्रमाला होणारा तोटा भरून काढण्यासाठी तो भार बीएसईएसच्या वीज ग्राहकांवर टाकत असल्याची बाब राज्य वीज नियामक आयोगाने दाखवून दिली असून सर्वोच्च न्यायालयाने देखील त्यास समर्थन दिले आहे, तरीही बेस्टने ही पध्दत सुरुच ठेवली असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करणार येत आहे,
(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

बेस्ट उपक्रमा मार्फत विद्युत पुरवठा व परिवहन या दोन महत्वाच्या सेवा मुंबईकरांना पुरविल्या जातात. सुरुवातीला बेस्ट उपक्रमाच्या वाहतुक विभागाची तूट विद्युत ग्राहकांच्या वीज देयकामधून वसूल करण्यास महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग व विद्युत अपिलिय प्राधिकरणाने मनाई केली होती. सदर मनाई करण्याच्या आदेशाविरुध्द बेस्ट प्रशासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सदर प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दि. ०८/०२/२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य वीज नियामक आयोगाने, दि. १ जून, २०१२ पासून बेस्ट उपक्रमाच्या वाहतूक विभागाची तूट विद्युत ग्राहकांकडून वसूल करण्याचे आदेश दि. १६/०५/२०१२ रोजी दिले.

राज्य विज नियामक आयोगाच्या निर्णयाविरुध्द इंडियन हॉटेल्स व इतर यांनी दाखल केलेल्या अपीलावर विद्युत अपीलीय प्राधिकरणाने सदरहु आदेश रद्दबादल ठरविला व योग्य ते आदेश देण्याबाबत राज्य वीज नियामक आयोगास दि. ३१/१०/२०१४ रोजी आदेशीत केले.

विद्युत अपीलीय प्राधिकरणाच्या निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०८/०२/२०११ रोजी दिलेल्या आदेशाशी विसंगत असल्यामुळे त्या विरोधात बेस्ट उपक्रमाने मा.सर्वोच्च न्यायालयात दिवाणी अर्ज क्र.१०४८८ दाखल केला आहे. त्यावर दि.०८/१२/२०१४ रोजी सुनावणी होवून, मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या पुढील आदेशापर्यंत बेस्टला वीज ग्राहकांकडून "परिवहन विभाग तूट वसूली आकार" घेण्यास संमती दिली आहे. त्यांच्या पुढील आदेशापर्यंत इतर कोणताही निर्णय अंमलात आणू नये असेही आदेश दिले आहेत.

सद्य:स्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून, मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णयानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी निविदा काढताना केलेल्या गैरप्रकारांबाबत

**(३४) * २०१०१ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) शासकीय नियम आणि निविदा प्रक्रियेला डावलत रस्ते कंत्राटदार जे.कुमार यांना सरळ १८.९० कोटी रुपयांचे ध्वनीरोधकांचे काम दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन रुग्णालय, किंग्जसर्कल-तुळपुले चौक, हिंदमाता उड्डाणपूल या विविध उड्डाणपूलासाठी ध्वनीरोधकांचे काम देताना निविदा न काढता एमएमआरडीएने जे.कुमार या कंत्राटदारास काम देण्याची कारणे काय आहेत,

(३) याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली यांनी एमएमआरडीए आयुक्त यु.पी.एस. मदान यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारही केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या तक्रारीनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधिन बाबी संदर्भात माहे एप्रिल, २०१५ मध्ये तक्रार प्राप्त झाली आहे. हे खरे आहे. पुलावरील ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत दि.०७.१२.२००९ रोजी देण्यात आलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा उड्डाणपुलावर ध्वनीरोधक बसविण्याचे काम हाती घेतले. याकरिता केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील केंद्रीय सडक अनुसंधान संस्था (CRRI) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली. या संस्थेने सादर केलेल्या अंदाजपत्रकानुसार व त्यांच्या देखरेखीखाली ध्वनीरोधक बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. ध्वनीरोधक हा उड्डाणपुलाचा घटक असल्याने तसेच पुल देखभाल कालावधीत असल्याने पुलाच्या कंत्राटदारास अतिरिक्त बाब म्हणून प्राधिकरण व कार्यकारी समिती यांच्या मंजूरीनंतर ध्वनीरोधक बसविण्याचे काम देण्यात आले आहे. या सर्व बाबीत विहित प्रक्रियेचे पालन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर करण्यात आले आहे.

-----------------

**नवी मुंबईतील तळोजा कारागृहात तीन भ्रमण दूरध्वनी हॅंडसेट सापडल्याबाबत**

**(३५) * १६३२२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तळोजा कारागृहातील अंडासेलमध्ये मा.गृह राज्यमंत्र्यांच्या भेटीच्या अगोदर दिनांक १५ मे, २०१५ रोजी कैद्यांकडे तीन भ्रमण दूरध्वनी हॅंडसेट सापडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आहेत, त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली तसेच तुरुंगाची सुरक्षा व्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. नवी मुंबईतील तळोजा कारागृहातील अंडासेलमध्ये दिनांक १४ मे २०१५ रोजी बेवारस अवस्थेत तीन भ्रमण दूरध्वनी हॅंडसेट सापडले आहेत.

(२) अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(३) कारागृहात सापडलेले मोबाईल बंद अवस्थेत असून त्यांच्या बॅटरी फुगलेल्या अवस्थेत होत्या व मोबाईल हॅंडसेट्स मध्ये सिम कार्ड नव्हते. सदर मोबाईल कोणत्याही कैद्याकडे सापडले असून बेवारस अवस्थेत पडलेले आढळले.

आढळलेले मोबाईल जरी सुस्थितीत नसले व सिम कार्ड विरहीत असले तरीही सदर घटनेची सखोल चौकशी करण्यात आली सकृत दर्शनी जबाबदार सुरक्षा रक्षकांना निलंबित करुन इतर कसूरदार अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील वाशी नाका, माहूल व मानखुर्द परिसरात एमएमआरडीएने बांधलेल्या सदनिका रिक्त असल्याबाबत

**(३६) * २५०१७ श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाशी नाका, माहूल व मानखुर्द परिसरात एमएमआरडीएने प्रकल्पग्रस्तांसाठी बांधलेल्या ६७८६ सदनिका मुंबई महानगरपालिकेकडे सन २०१२ मध्ये हस्तांतरीत केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिका अद्याप रिक्त असून त्या सदनिकेच्या सुरक्षिततेसाठी मुंबई महानगरपालिकेने आतापर्यंत कोट्यावधी रुपये सुरक्षा रक्षकांवर खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिका रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महापालिकेस एमएमआरडीए प्राधिकरणाकडून २०१२ मध्ये वाशी नाका, माहुल आरएनए रॉकलाईन, नटवर पारेख, लल्लूभाई कंम्पाऊंड विडीओकॉन अथिती आणि एचजी केमिकल्स ह्या ठिकाणी एकूण ८३३६ सदनिका हस्तांतरीत झालेल्या आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या एकूण ८३३६ सदनिकांपैकी ३४९९ सदनिकांचे वाटप करण्यात आले असून ४८३७ सदनिका रिक्त आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर सदनिकांच्या सुरक्षा व्यवस्थेकरीता मार्च, २०१२ ते जून, २०१५ पर्यंत एकूण रु. १३,८३,३४,७१६/- एवढा खर्च केलेला आहे.

(३) व (४) सदरच्या सदनिका शहरापासून लांब असल्यामुळे प्रकल्पग्रस्त आपल्या मुळच्या ठिकाणावरुन सदर ठिकाणी जाण्यास तयार होत नसल्यामुळे सदरहु सदनिका रिक्त राहतात.

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.